महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail: 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

## पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०२०-२१

--------------------

**प्रसिध्दी निवेदन-०२/२०२०**
**दि.०९.०७.२०२०**

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७, दि.०७.०३.२०१९ व दि.२३.०६.२०२० अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी इ.११ वी प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळ https://pune.11thadmission.org.in/ आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये पुणे महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील शासन मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांचे सर्व इ.११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होतील. सदर गावांची यादी खालील प्रमाणे आहेत.

| क्र. | गावाचे नांव |
|---|---|
| १ | कळस, धानोरी, लोहगांव(उत्तर), लोहगांव (पुर्व), मुंढवा (केशव नगर पुर्व), हडपसर(साडेसतरानळी), फुरसुंगी, उरुळी देवाची दक्षिण पुर्व (हडपसर), महंम्मदवाडी, उंड्री, येवलेवाडी, कात्रज, धायरी, वडगांव बु., आंबेगांव बुद्रक, आंबेगांव खुर्द, शिवणे, बावधण खुर्द, वडगांव खुर्द, बाणेर, बालेवाडी, |

उपरोक्त गांवातील सर्व मान्यता कनिष्ठ महाविद्यालयांतील इ.११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने शासनाच्या https://pune.11thadmission.org.in/ या संकेतस्थळावरुन होतील. सदर प्रकरणी कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयाने इ.११ वी चे प्रवेश ऑफलाईन पध्दतीने देण्यात येऊ नये अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेवर/प्राचार्य यांच्यावर राहील, याची नोंद घ्यावी.

नव्याने समाविष्ट होणा-या गावातील कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी https://pune.11thadmission.org.in/ या संकेतस्थळावरुन करावी. तसेच कॉलेजचे लॉगीन तयार करण्यासाठी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात त्वरीत 11thonlineadmissiondydpune@gmail.com या ई-मेल आयडी वर प्रस्ताव पाठवावा, सदरच्या कामासाठी दि.१५.०७.२०२० पर्यंतच मुदतवाढ असल्याने प्रथम प्राधान्याने कार्यवाही करावी.

**दक्षता घ्या, सुरक्षित राहा.**

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या www.dydepune.com व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या https://pune.11thadmission.org.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मीना शेंडकर)
सचिव,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक,
पुणे विभाग पुणे-१



Scanned with CamScanner